# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.01.2025** **वारःशुक्रवार**

---

1. केंद्रिय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना
2. इस्त्रोची ऐतिहासिक कामगिरी करत स्पेडेक्स मोहिम यशस्वी
3. राष्ट्रीय खेल पुरस्कारांचं आज राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण
4. छत्तीसगढमध्ये 12 नक्षलवादी ठार आणि
5. विश्वचषक खोखो स्पर्धेत भारताच्या पुरुष आणि महिल संघ उपांत्यपूर्व फेरीत दाखल

**केंद्रीय मंत्रिमंडळ-वैष्णव**

केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांसाठी आठव्या वेतन आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. याच्या शिफारशी 2026 पासून लागू होतील. सातव्या वेतन आयोगाचा कालावधी पुढच्या वर्षी संपणार आहे. तोपर्यंत या वेतन आयोगाच्या शिफारसी प्राप्त होतील, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. आयोगाचे अध्यक्ष आणि 2 सदस्यांची नेमणूक लवकरच होईल, असंही ते म्हणाले. श्रीहरीकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात तिसरं लाँच पॅड उभारायलाही केंद्रीय मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. चंद्रावर मानव पाठवण्याच्या इस्त्रोच्या आगामी मोहिमांसाठी याचा वापर होईल.

**स्पेडेक्स**

इस्त्रोच्या महत्त्वाकांक्षी स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रह एकमेकांशी जोडण्याचं डॉकिंग काल यशस्वी झालं. या मोहिमेअंतर्गत अवकाशात सोडलेल्या चेसर आणि टार्गेट या दोन उपग्रहांना इस्त्रोनं यशस्वीरित्या जोडलं. इस्त्रोच्या या यशामुळे अशा प्रकारचं तंत्रज्ञान असलेला भारत हा जगातला चौथा देश ठरला आहे. अंतराळ मोहिमांसाठी हे तंत्रज्ञान अतिशय महत्त्वाचं आहे. चंद्रयान 4 आणि भारतीय अंतराळ स्थानक उभारणीसारख्या भविष्यातील अनेक मोहिमांसाठी याचा इस्त्रोला मोठा उपयोग होणार आहे. इस्त्रोच्या या यशाबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, आणि पंतप्रधानांनी शास्त्रज्ञांचं अभिनंदन केलं आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज राष्ट्रीय खेल पुरस्कारांचं वितरण होणार आहे. क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या देशातील सर्वोच्च क्रीडा पुरस्कार असलेल्या मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारासह अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कार प्रदान करण्यात येतील. चार क्रीडारत्नांना खेलरत्न पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार असून 32 खेळाडूंना अर्जुन पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

डी गुकेश (बुद्धिबळ), हरमनप्रीत सिंग (हॉकी), प्रवीण कुमार (पॅरा ॲथलेटिक्स), मनु भाकर (नेमबाजी) या प्रकारांत खेल रत्न पुरस्कार, तर महाराष्ट्रातील पॅरा ॲथलेटिक्समध्ये दैदिप्यमान कामगिरी करणारा सचिन खिलारीला अर्जून पुरस्कारानं गौरविण्यात येणार आहे आणि नेमबाज स्वप्निल कुसाळे यांचाही अर्जून पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. द्रोणाचार्य पुरस्कार विजेत्यांमध्ये सुभाष राणा, दीपाली देशपांडे, संदीप सांगवान यांचा समावेश आहे.

**उपराष्ट्रपती-लक्षद्विप**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून तीन दिवसांच्या लक्षद्विप दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात अनेक सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थित राहणार असून, विविध सार्वजनिक प्रकल्पांचं त्यांच्या हस्ते उद्धाटन होणार आहे तसंच स्वयं-सहाय्यता गट आणि त्यांचे लाभार्थी यांच्याशी ते संवाद साधतील.

**स्वामित्व**

स्वामित्व योजनेअंतर्गत 10 राज्य आणि केंद्र शासित प्रदेशातील 50 हजार गावातील 65 लाख लाभार्थींना प्रॉपर्टी कार्डचं वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरस्थ माध्यमातून होणार आहे. ग्रामीण भारताचा आर्थिक विकास आणि गरजूंना हक्कांची घरं उपलब्ध करुन देणं तसंच ड्रोन सर्वेक्षणाद्वारे घरांची नोंद ठेवणं हा पंतप्रधानांनी सुरू केलेल्या या योजनेचा उद्देश आहे. यामुळे मालमत्तेची नोंदणी सुलभ करणं, बँक कर्जाद्वारे संस्थात्मक कर्ज उपलब्ध करुन देणं, मालमत्तेशी संबंधित वाद कमी करणं आणि ग्रामीण भागात चांगल्या मालमत्तांचं मूल्यांकन आणि मालमत्ता कर संकलनाला प्रोत्साहन दिलं जातं.

आतापर्यंत 3 लाखांहून अधिक गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं आहे तर दिड लाखांहून अधिक गावांसाठी सुमारे 2 कोटी 25 लाख मालमत्ता कार्ड तयार करण्यात आले आहेत. पुद्दुचेरी, अंदमान आणि निकोबार बेटे, त्रिपुरा, गोवा, उत्तराखंड आणि हरियाणामध्ये ही योजना पूर्ण क्षमतेनं लागू झाली आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि अनेक केंद्रशासित प्रदेशांमध्येही ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं आहे

**भारत-ब्रिटन**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी त्यांचे ब्रिटनचे समपदस्थ जॉन हेली यांच्याबरोबर दुरस्थ माध्यमातून द्विपक्षीय स्तरावरील चर्चा काल केली. दोनही देशांदरम्यान सध्या सुरु असलेल्या संरक्षण सहकार्याचे मुद्दे, द्विपक्षीय संबंधांना गती देण्याची गरज आदी मुद्यांवर भर देण्यात आला. तसंच इलेक्ट्रिक प्रोपल्शन आणि जेट इंजिनसारख्या विशिष्ट संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमधील प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला. दोनही देश हिंद प्रशांत क्षेत्रात संयुक्तपणे सागरी सहकार्य वाढवण्याबाबत विचारविनिमय झाला.

**निर्यात**

भारताचं इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांची निर्यात 35 पुर्णांक 11 टक्क्यांनी वाढून दोन वर्षांच्या उच्चांकी पातळीवर पोहोचला आहे. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये 2 पुर्णांक 65 अब्ज डॉलर्स असलेली निर्यात वाढून यावर्षी साडेतीन अब्ज डॉलर्सच्या वर पोहोचली आहे. भारतात उत्पादित झालेल्या घरगुती वापराच्या वस्तू आणि उच्च मूल्याच्या भारतीय वस्तूंच्या परदेशी मागणीत वाढ झाल्याचं वाणिज्य मंत्रालयानं जारी केलेल्या आकडेवारीवरुन स्पष्ट झालं आहे. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-डिसेंबर कालावधीत देशाची इलेक्ट्रॉनिक निर्यात 28 पुर्णांक 6 टक्क्यांनी वाढून 26 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे, 2023-24 या आर्थिक

वर्षातील याच कालावधीत 20 अब्ज डॉलर्स होती. केंद्र सरकारच्या उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह (PLI) योजनेचं हे यश मानलं जात आहे.

**<u>छत्तीसगढ</u>**

छत्तीसगढमध्ये नक्षलवादी आणि सुरक्षा दल यांच्यात सुरु असलेल्या चकमकीत 12 नक्षलवादी ठार झाले. छत्तीसगढ तेलंगणा सीमेवर बीजापूर जिल्ह्यातील दक्षिण बस्तरच्या जंगलात ही चकमक सुरु आहे. या भागात मोठ्या प्रमाणात नक्षलवादी हालचालींबाबत माहिती मिळाल्यानंतर केंद्रिय राखीव पोलीस दल, कोब्रा बटालिअन, जिल्हा राखीव सुरक्षा दल यांनी संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली.

**<u>स्टार्टअप-गोयल</u>**

देशातील स्टार्ट-अप आत्म-निर्भर, सर्व समावेशक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक भारताचा दृष्टिकोण अधोरेखित करण्यात महत्वाची भूमिका बाजवतील असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी म्हंटलं आहे. भारतात स्टार्टअप सुरू झाल्याच्या नवव्या वर्षा निमित्त नवी दिल्लीत आयोजित समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमात प्रभात फॅक्ट बुक आणि भारत स्टार्टअप चॅलेंज यांचं अनावरण करण्यात आलं. स्टार्टअप केवळ व्यवसाय नसून, बादलांचं माध्यम असल्याचं गोयल यावेळी म्हणाले. आजमितीला देशात 59 हजारांहून स्टार्टअप सुरू असून, स्टार्टअप मध्ये जगात देश तिसऱ्या स्थानी असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>दिल्ली-उमेदवारी अर्ज</u>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. आतापर्यंत एकंदर 841 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. सोमवारी 20 तारखेपर्यंत उमेदवार आपले अर्ज मागे घेऊ शकतात. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी 5 फेब्रुवारीला मतदान होणार असून, 8 फेब्रुवारीला मतमोजणी होईल.

**<u>दिल्ली-जागा वाटप</u>**

दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणुकीत, 70 जागांपैकी 68 जागांवर भारतीय जनता पक्ष निवडणूक लढवणार आहे. उर्वरित दोन जागांपैकी प्रत्येकी एक जागा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे घटकपक्ष असलेल्या संयुक्त जनता दल आणि राम विलास गटाच्या जनशक्ती पक्षाला देण्यात आल्या आहेत. बुरारी विधानसभा मतदारसंघातून संयुक्त जनता दल आणि देओली विधानसभा मतदार संघातून जनाशक्ती पक्ष-रामविलास गटाचा उमेदवार निवडणूक लढवतील असं भाजपचे राष्ट्रीय सचिव अरुण सिंह यांनी काल प्रसार मध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>डिजीटल कौशल्य</u>**

डिजीटल कौशल्य क्षेत्रात कॅनडा आणि जर्मनीला मागे टाकत भारतानं दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. असा अहवाल क्यूएस वर्ल्ड फ्युचर स्किल्स इंडेक्सने जारी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मोदी यांनी या कामगिरीबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात आनंद व्यक्त केला. गेल्या दशकात सरकारनं देशातील तरुणांना स्वावलंबी बनण्यास आणि रोजगार निर्मितीत सक्षम बनवणाऱ्या कौशल्यांनी सुसज्ज करण्याचे काम

केलं आहे. देश समृद्धी आणि युवा सक्षमीकरणाच्या दिशेने प्रवास करत असताना हा अहवाल प्रसिध्द होणं समाधानकारक असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**बॅडमिंटन**

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची महिला खेळाडू अग्रमानांकीत पी. व्ही. सिंधुने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर मैदानात काल झालेल्या सामन्यात तिने जपानच्या मनामी सुईझू हिचा 21-15, 21-13 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत सिंधुचा सामना इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस् टुनजुंग हिच्याशी होणार आहे. याच स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत भारताच्या सात्विकसाइराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनेदेखील उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.

**विश्वचषक खोखो**

विश्वचषक खोखो स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या आणि महिलांच्या संघांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश निश्चित केला असून आपापल्या गटात दोन्ही संघ अव्वल स्थानावर आहेत. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या पुरुषांच्या संघानं काल भूतानवर 71-32 असा विजय मिळवला. तर महिला संघानं मलेशियावर 100-20 अशी मात केली.

**हवामान**

उत्तर भारतातील बहुतांश भागात धुक्याची चादर पसरली आहे. दिल्ली एनसीआर भागात आज सकाळी दाट धुकं आहे. पंजाब, हरियाणा, चंदिगड, उत्तर प्रदेश, दिल्ली एनसीआर आणि राजस्थान भागात रात्रीच्या वेळी तसंच उद्या सकाळी दाट धुकं राहील. हिमालयाच्या पश्चिम प्रदेशात पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता असून पंजाब, हरियाणा, चंदीगड, पश्चिम उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये पुढचे दोन दिवस पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.